# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/11/2023 (बुधवार) दुपार


---

## खूनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. खापरखेडा :–** अंतर्गत १५ कि. मी अंतरावरील आरोपीचे राहते घरासमोरील रोडवर वार्ड न. ०३ बाबुलखेडा येथे दिनांक ३१/१०/२०२३ चे २२.०० वा. ते २२.३० वा. दरम्यान गावात भाजपा पक्षाकडुन प्रचार करीत होते प्रचार हा छोटा चार्जिंगच्या ब्लुटुथ स्पीकरने सुरू होता प्रचार हा २१/४५ वा. पर्यत करून बंद झाला त्यावेळेस गावातील बौद्ध विहाराजवळ आरोपी क्र. १) सुनिल नामदेव पाटील वय अंदाजे ५० वर्ष यांचे घरासमोर गावातील काही लोक गप्पा गोष्टी करत उभे होते तेव्हा २२/०० वा. सुमारास गावातील आरोपी क्र. २) हर्षद सुनिल पाटील, वय २१ वर्ष दोन्ही रा. वार्ड न. ०३ बाबुलखेडा यांच्या हातात ब्लुटुथ स्पीकर दिसल्याने फिर्यादी नामे– पंकज रविन्द्र झाडे वय २५ वर्ष रा. वार्ड नं.३ बाबुलखेडा ता. कामठी यांचा चुलत भाउ मिथुन उर्फ गोलु झाडे याने हर्षद ला स्पीकरचा माइक मागितला तेव्हा हर्षद याने त्यास तु स्वत:हा मिथुन चक्रवर्ती आहे तुला स्पीकर कशाला पाहीजे मी तुला स्पीकरचा माइक देत नाही असे म्हणुन शिवीगाळी केली. तेव्हा मिथुन याने त्यास म्हटले की, शिवीगाळी का करतो मी तर स्पीकरचा माइक मागितला तेव्हा फिर्यादी व गावातील काही इसम दोघांना समजावित असतांना तिथे हर्षदचे वडील सुनिल पाटील आले व मिथुनला तु जास्त रंगदार झाला का तुझी रंगदारी काढुन दाखवु का असे म्हणुन हर्षद व त्याचे वडील तेथुन घरी निघुन गेले. फिर्यादी हा मिथुनला तेथुन घरी घेवुन जात असता हर्षद व त्याचे वडील सुनिल पाटील हे घरातुन बाहेर रोड वर आले व सुनिल पाटील याने मिथुनला चाकुने मारले तेव्हा मिथुनने चाकु उजव्या हातात पकडला व चाकु ओढल्याने त्याच्या हाताला जखम झाली. तेव्हा हर्षद पाटील हा जोरात ओरडला आज तुला खत्म करून टाकतो, म्हणुन हातातील चाकुने मिथुनला पोटाच्या डाव्या बाजुस मारून गंभीर जखमी करून तेथुन दोघेही निघुन गेले. तेव्हा मिथुन जखमी अवस्थेत ओरडत असता फिर्यादी व गावातील काही लोकांच्या मदतीने मिथुनला उपचारा करीता मेयो हॉस्पीटल नागपुर येथे नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपींविरुध्द कलम ३०७, ५०४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि मलकुवार मॅडम पोस्टे खापरखेडा मो. नं ९६२३६८७६२७ या करीत आहे.

## कॉपर वायर चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत  १५ कि. मी. अंतरावरील राजेश तपासे यांचे शेतातील कोहळी मोहळी शिवार येथे फिर्यादी नामे— संजय मधुकर चौव्हान वय ४५ वर्षे, रा. नवेट पो. हरचेरी जि. रत्नागिरी ह. मु. कोहळी मोहळी ता. कळमेश्वर हे खाजगी कंपनी मनि इलेक्ट्रीकल वर्क मुबंई याचे कंपनीमध्ये सुपरवायजर या पदावर काम करत आहे. व त्याचे कंपनीला कळमेश्वर ते काटोल मध्य रेल्वे मंडळ नागपूर यांचेकडुन काम मिळाले असुन सदर कामानिमित्त कंपनीने इलेक्ट्रीक कंपनी अजनी कडुन जी.एस.आय. ००१९ कँटनरी कॉपर वायर ३००० मिटर असलेला ड्रम मिळालेला होता व त्यामधील उरलेला १००० मिटर वायर हा राजेद्र पांडुरंग तपासे रा. मोहळी ता. कळमेश्वर शेतालगत स्टोअर रुमच्या बाजुला खुल्या जागेत ठेवला होता तिथे त्याचे साईडवर काम करणारे मजुर राहत होते. दिनांक २८.१०.२०२३ रोजी सकाळी ०९.०० ते रात्री ०८.१० वा पावेतो लेबर काम करुन परत आलेत त्यांनतर मजुर हे जेवन करुन झोपी गेले व दिनांक २९.१०.२०२३ रोजी सकाळी ०९.०० वाजता दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने अर्धवट वापरलेला जी.एस.आय. ००१९ कँटनरी कॉपर वायर १००० मिटर चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा ज्योती मो. नं ९५५२५५६३४१हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**